सत्यमेव जयते

# पर्यटन संचालनालय (DoT),महाराष्ट्र शासन

मुख्यालय :साखर भवन, ४था मजला प्लॉट नं. २३०, नरीमन पॉईंट, मुंबई.४०००२१-
दूरध्वनी क्र.९१- २२-६९११०७६००,
ई-मेल – diot@maharashtratourism.gov.in वेबसाईट – www.maharashtratourism.gov.in

MAHARASHTRA TOURISM

क्र/.सं.प.आस्थापना/सेवार्थ/सहसंचालक-उपसंचालक/७१/२०२६/E-३२६२०५४/२२०८ दिनांक: डिजिटल स्वाक्षरीचा
16 OCT 2026

प्रति,

सह/ उप सचिव(आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२

विषय : पर्यटन विभागाच्या अधिनस्त पर्यटन संचालनालय या कार्यालयातील उपसंचालक, सहायक संचालक, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७.१२.२०२६
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/का.१२, दि.१६.०२.२०१८

महोदय/महोदया

संदर्भाधिन क्र.१ येथील दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

उक्त शासन निर्णयास अनुसरून पर्यटन विभागाच्या अधिनस्त पर्यटन संचालनालय मुख्यालयातील एस-१५:४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीतील सहायक संचालक १ पद व "माहिती तंत्रज्ञान अधिकारी" ०२ पदे तसेच संचालनालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयातील (विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व नागपूर) एस-२३: ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीतील "उपसंचालक" ४ पदे समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी मंत्रालयीन विभाग तसेच विभागांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

उपरोक्त पदासाठी प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छुक असलेल्या अधिकाऱ्यांनी परस्पर पर्यटन संचालनालयाकडे अर्ज सादर करू नयेत. त्यांनी आपापल्या मंत्रालयीन विभागांमार्फत अर्ज पर्यटन विभाग, मंत्रालय कडे सादर करावेत. परस्पर अर्ज सादर केल्यास त्या अर्जांचा विचार करता येणार नाही.

आपणास विनंती करण्यात येते कि, इच्छुक अधिकाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्जांची छाननी करून आपल्या विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने संबंधित इच्छुक अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहिती व मागील पाच वर्षांच्या परिपूर्ण गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रतींसह पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठवावा.

सदरचे पत्र आपल्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या कृपया निदर्शनास आणावे, हि विनंती.

आपला,

(विकास पानसरे, भा.प्र.से)
संचालक

प्रत:

उपसचिव(पर्यटन-२), पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.